**नियमित फौजदारी प्रकरण क्र.४८/२०१०.**
**निशाणी क्र.९५ सोबत.**

**MHKO120003652010**

# <u>निशाणी क्रमांक ९५ खालील आदेश.</u>

( महाराष्ट्र सरकार वि. सुंदर जाधव वगैरे )

आरोपी क्र.०८ यांनी प्रस्तुत अर्ज करून त्यांना प्रकरणामध्ये ठेवण्यात आलेल्या दोषारोपांमधून मुक्त करण्यासाठी केला आहे.

०२. आरोपी क्र.८ यांच्या कथनांनुसार, प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांच्यावर भारतीय दंड विधान कलम ४०६, ४०८, ४२६, ४६८, ४७१ व ४७७-अ, सह कलम ३४ नुसार दोषारोप दाखल करण्यात आले आहे. मात्र त्या अनुषंगाने प्रकरणामध्ये कोणताही पुरावा पोलीसांकडून दाखल करण्यात आलेला नाही. मूळ फिर्यादी यांनी दिनांक ०१/०४/२००२ ते ३१/०३/२००३ या कालावधीमध्ये संस्थेचे लेखापरीक्षण करून गैरव्यवहाराबाबत आरोप केले आहेत. वास्तविक मात्र सदर कालावधीमध्ये आरोपी क्र.८ हे संस्थेत संचालक म्हणून कार्यरत नव्हते. त्यामुळे, त्यांच्या विरुद्ध कोणतीही केस तयार होत नाही. सबब, त्यांनी सदर दोषारोपांमधून त्यांना मुक्त करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर अभियोगपक्षातर्फे निशाणी क्र.११७ वर म्हणणे दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या कथनांनुसार, आरोपी क्र.८ यांनी इतर आरोपींशी संगनमताने गुन्हा केलेला असून त्याबाबतचा भक्कम पुरावा दोषारोपपत्रामध्ये आलेला आहे. तसेच, आरोपी क्र.८ हे दिनांक ०१/०४/२००२ ते ३१/०३/२००३ या कालावधीमध्ये संचालक म्हणून काम पहात होते व त्या कालावधीमधील झालेल्या सभा व ठरावांवर त्यांच्या सह्या असल्यामुळे ते या गुन्ह्यात सामील असल्याचे दिसून येते. त्यामुळे, आरोपींचा सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती अभियोगपक्षाने केलेली आहे.

०४. प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. तसेच, आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेल्या निशाणी क्र.११६ वरील लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले.

०५. फौजदारी संहितेचे कलम २३९ नुसार न्यायदंडाधिकारी दोषारोपपत्राचे व त्यासोबत असणाऱ्या कागदपत्रांचे अवलोकन करून जर आरोपीविरूध्द केलेले आरोप निराधार असतील तर

आरोपीस विनादोषारोप सोडले जाते. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, फिर्यादी श्रीपाद तवाणाप्पा मगदूम - द्वितीय अप्पर लेखा परिक्षक सह. संस्था कोल्हापूर यांनी महालक्ष्मी ना. सह. पत संस्था, शेणगांव या संस्थेचे दिनांक ०१/०४/२००२ ते ३१/०३/२००३ अखेर लेखा परीक्षण करून दिनांक २५/०१/२००८ रोजी पूर्ण केलेले आहे. फिर्यादीने दिनांक ०२/०६/२००९ रोजी खबरी जबाब दिलेला आहे. खबरी जबाबामध्ये त्याने असे कथन केले आहे की, खालील चेअरमन, संचालक व मॅनेजर यांनी अपहार केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. श्रीपतराव विठ्ठल म्हंगोरे, | चेअरमन. |
| २. | श्री. दत्तात्रय महादेव विभुते, | संचालक. |
| ३. | श्री. गुरूदत्त श्रीपतराव म्हांगोरे, | संचालक. |
| ४. | श्री. नागेश कृष्णाजी ताम्हणकर, | संचालक. |
| ५. | श्री. मधूकर मारूती कुंभार, | संचालक. |
| ६. | श्री. गुंडू गणपती कोरगांवकर, | संचालक. |
| ७. | श्री. सुरेश राजाराम कालेकर, | संचालक. |
| ८. | श्री. सुंदर शिवाजी जाधव, | संचालक. |
| ९. | सौ. सावित्री पंडित सांळोखे, | संचालिका. |
| १०. | सौ. शोभाताई ज्ञानदेव आमणगी, | संचालिका. |
| ११. | श्री. अशोक पांडूरंग मांडे, | मॅनेजर. |

०६. फिर्यादी जबाबामध्ये असे सुद्धा कथन आहे की, वरील चेअरमन, संचालक, सदस्य व मॅनेजर यांनी आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडले नाही. दिनांक ३१/०३/२००३ अखेर एकूण रु.९२,५८,०००/- कर्ज असून ते पूर्णपणे थकीत आहे. कर्ज वाटप करताना, अपुऱ्या कागदपत्रांवर, जामीनदार न घेता, तारणाचा तपशील न घेता तसेच कर्ज वाटपाच्या इतर बाबी लक्षात न घेता कर्ज वाटप करण्यात आली आहेत. तसेच, कर्ज वसुलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच, कर्ज वाटप करताना व्यक्तिगत हितसंबंध जोपासून पदाचा गैरवापर करून संचालक व नातेवाईक यांना कर्ज वाटप करण्यात आले असून वसुलीची कार्यवाही करण्यात आली नाही.

०७. सर्व संचालक व व्यवस्थापक मंडळाने संस्थेच्या पोट नियमांविरुद्ध व गैर व्यवस्थापन करून अनियमित कर्ज वाटप करून व गुंतवणूक करून रक्कम रू.१२,४२,५२१/- इतक्या संस्थेच्या निधीचा गैरविनियोग केला आहे. संचालक व व्यवस्थापक मंडळाने खोटी कागदपत्रे तयार करून संस्थेच्या ठेवीदारांचा व सभासदांचा विश्वासघात व फसवणूक करून संस्थेच्या निधीचा अपहार केला आहे.

०८. प्रस्तुत प्रकरणामध्ये तपासी अंमलदाराने खालील साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शशिकांत दत्तात्रय ढेरे, | ७. | राधाबाई सुरेश कालेकर, |
| २. | अशोक ईश्वरा तेली, | ८. | गोपाळ आक्काप्पा कुंभार, |
| ३. | शंकर हरी शिंदे, | ९. | राजाराम शंकर कुंभार, |
| ४. | विजय ईश्वरा भोसले, | १०. | ज्ञानदेव तुकाराम मुंगळे, |
| ५. | दत्तात्रय बळवंत साळोखे, | ११. | पुरुषोत्तम वासुदेव फाटक, |
| ६. | सुनिल प्रभाकर नार्वेकर, | १२. | लतिका लक्ष्मण जांबवे, |

०९. वरिल सर्व साक्षीदारांच्या जबाबाच्या टिपणाचे अवलोकन केले असता, त्यांनी असे कथन केले आहे की, आरोपी क्र.१ ते ११ हे श्री महालक्ष्मी ना. सह. पत संस्था मर्या., शेणगांव येथे संचालक व व्यवस्थापक म्हणून काम करत होते. त्यांनी संस्थेमध्ये नियमबाह्य कर्ज, नियमबाह्य गुंतवणूक, जागा विक्रीसाठी खोटी कागदपत्रे करून रक्कम रू. १२,४२,५२१/- इतक्या रक्कमेचा अपहार केलेला आहे.

१०. तपासी अंमलदाराने संबंधीत प्रकरणाशी निगडित कागदपत्रे, जप्ती पंचनामा दिनांक ०३/०६/२००९, २०/०७/२००९, ०८/०८/२००९ पंचांसमक्ष तयार केलेला आहे. वरील फिर्यादीच्या जबाबाचे, साक्षीदारांच्या जबाबाचे व अभिलेखावरील उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, आरोपी क्र.८ व इतर आरोपींच्या विरुद्ध दोषारोप ठेवण्याइतपत प्रथमदर्शनी पुरावा दिसून येत आहे. तसेच, प्रकरणाचे अवलोकन केले असता, आरोपीविरुद्ध केलेले आरोप निराधार वाटत नाहीत.

११. आरोपी क्र.८ तर्फे निशाणी क्र.१६ वर लेखी युक्तिवाद सादर केला आहे. आरोपीने खालील मुद्दयांवर आपला बचाव नोंदविला आहे.

१. आरोपीविरुद्ध कोणताही पुरावा नाही.
२. आरोपी हा सदर कालावधीमध्ये सभासद नव्हता.
३.बहुतांशी कर्ज प्रकरणे ही सन १९९७, १९९८, १९९९ ची आहेत.
४. आरोपीने संस्थेचा राजीनामा दिला आहे.
५.आरोपी हा सरकारी खात्यात नोकरीस आहे.
६. गैरव्यवहाराशी आरोपीचा काहीही संबंध नाही.
७. काही कागदपत्रांवरील हस्ताक्षर वेगवेगळे आहे.

१२. मान्य परिस्थितीनुसार, अभिलेखावरील साक्षीदारांच्या जबाबावरून व कागदपत्रांवरून

आरोपी विरुद्ध दोषारोप ठेवण्याइतपत पुरावा आलेला आहे. त्यामुळे, आरोपीने घेतलेले सर्व बचाव हे पुराव्याअंती शाबीत होणार आहेत. सद्यःस्थितीमध्ये आरोपीने घेतलेले बचाव हे पुराव्याविना आहेत. त्यामुळे सद्यःस्थितीमध्ये आरोपीचे बचाव मी मान्य करीत नाही.

१३. आरोपीने त्याच्या बचावासाठी खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतला आहे. १. कर्नाटका सरकार वि. एल. मुनीस्वमय वगैरे (ए. आय.आर. १९७७ मा. सर्वोच्च न्यायालय, १४८९), तसेच २. सेंच्युरी स्पिनींग वि. महाराष्ट्र सरकार ( ए. आय.आर. १९७२ मा. सर्वोच्च न्यायालय, ५४५ ) उपरोक्त न्यायनिवाड्यांचे अवलोकन केले असता, आरोपीवरील दोषारोप निराधार असल्यामुळे त्यांना प्रकरणामधून दोषमुक्त केलेले होते. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये सर्व आरोपींविरुद्ध दोषारोप ठेवण्याइतपत पुरावा दिसून येत आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणामध्ये सर्व आरोपींवरील दोषारोप हे निराधार नाहीत. परिणामतः मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2022.07.14 17:08:34 +0530

स्थळ. गारगोटी. **( व्ही. बी. मुल्ला )**

दिनांक. १४/०७/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गारगोटी.